## म.गांधी यांच्या 150 व्या जयंती निमित्त उपक्रम

महाराष्ट्र शासन दिलेल्या आदेशाप्रमाणे नूतन महाविद्यालय, सेलू येथे म.गांधी जयंतीच्या150 व्या जयंती निमित्त 2 ऑक्टोबर 2018 पासून वर्षभर विविध कार्यक्रम करण्यासाठी उपक्रम राबविण्याचे ठरले. त्यासाठी खालील संयोजन समिती गठीत करण्यात आली.

अध्यक्ष :- प्राचार्य डॉ.शरद एस. कुलकर्णी

सदस्य :- 1) उपप्राचार्य प्रा.या.रा.गायकवाड
2) डॉ.संतोष दंडवते (संयोजक, विद्यार्थी उपक्रम समिती)
3) डॉ.आर.आर.बैनवाड (कार्यक्रमाधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना)
4) डॉ.किर्ती निरालवाड (महिला प्रतिनिधी)
5) प्रा.के.के.कदम (स्टाफ प्रतिनिधी)

**02 आक्टोबर 2018**

### म.गांधीजीना आवडणाऱ्या भजन- गायनाचा कार्यक्रम

**सकाळी 09:00** वाजता नूतन महाविद्यालय, सेलू व नूतन विद्यालय सर्व घटक संस्था यांच्या वतीने म.गांधीजीना आवडणाऱ्या भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष डॉ.एस.एम लोया व अन्य मान्यवर पदाधिकारी यांच्या हस्ते म.गांधीजीच्या प्रतिमेचे पुजन करुन गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. प्रा.डॉ.बैनवाड यांनी म.गांधीजीच्या विचारावर प्रकाश टाकला, तर संस्थेचे सहचिटणीस प्राचार्य डॉ.व्ही.के.कोठेकर यांनी म.गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

### गांधीजींच्या विचारावर आधारीत परीक्षा

**सकाळी 10:00 वाजता** म.गांधी यांच्या विचारावर आधारित म.गांधी जीवन विचार प्रचार परीक्षा महाविद्यालयात मुंबई सर्वोदय मंडळ, यांच्या सहकार्याने घेतली. 65 विद्यार्थी व विद्यार्थीनीनी ही परीक्षा दिली. डॉ.व्ही.एच.पांचाळ यांनी यासाठी दोन महीन्यापासून तयारी केली होती.




Scanned by CamScanner

### दुपारी 02:00 वाजता स्वदेशी व खादी विक्री व प्रदर्शन

म.गांधीजीनी स्वदेशीचे महत्त्व सांगीतले होते. मराठवाडा खादी ग्रामोद्योग शाखा सेलू यांच्या सहकार्याने खादी वस्त्राची विक्री महाविद्यालयात करण्यात आली. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विविध स्वदेशी वस्तू व खादीची अंदाजे पन्नास हजार रुपयाची खरेदी केली. याच वेळी आयोजित खादी वस्त्राच्या प्रर्दशनास अनेकांनी भेटी दिल्या.

म.गांधीच्या 150 व्या जयंती निमित्त वर्षभर श्रमदान, ग्रामीण भागात गांधी विचारांचा प्रसार, म.गांधीजींच्या विचारावर चर्चासत्र असे विविध उपक्रम घेण्याचे ठरले आहे.







Scanned by CamScanner